**रे.दि.मु.क्र. ४७५/२०१६ मधील निशाणी ९३ वरील आदेश**

(CNR NO.MHST-070034602016)

मुक्ताबाई आण्णा जाधव वगैरे ––– वादी

वि.

श्रीमती पार्वती शंकर कदम व इतर ––– प्रतिवादी

सदरहू अर्ज वादी यांनी मयत वादी क्र. १क(१) यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता व दाव्यात दुरूस्ती करण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जास पुरक शपथपत्र देण्यात आलेले आहे. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले.

२. प्रस्तावित वादींचे कथन असे की, वादी क्र. १क(१) कुसुम विलास जाधव हया दि. २६/०८/२०१८ रोजी मयत झाल्या आहेत. करीता, वादी क्र. १क(१) कुसुम विलास जाधव यांचे वारस वादी क्र. १क(२) ते १क(४) हे दाव्याचे कामी पूर्वीपासून समाविष्ठ आहेत. तसेच, दाव्यात तांत्रीक दोष राहू नये या करीता दुरूस्ती करणे आवश्यक असून दाव्यात कोणताही बदल होत नाही. तसेच, सदरील प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही. करीता, प्रस्तावित वादींनी दुरूस्तीचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली. प्रतिवादी यांचे वकीलांनी कथन केले की, अर्ज मुदतीत नाही. करीता, अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. वादी क्र. १क(१) कुसुम विलास जाधव हया मयत झाल्याबाबत मृत्यूप्रमाणपत्र (नि.क्र. ९६/१) वर दाखल केले असून वादी क्र. १क(१) कुसुम विलास जाधव हया दि.२६/०८/२०१८ रोजी मयत झाल्याबाबत मृत्यूप्रमाणपत्रावरून दिसून येते. तसेच, सदर वादी हे दाव्याचे कामी समाविष्ठ करण्यात आहेत. दाव्यामध्ये तांत्रीक दोष राहू नये म्हणून दाव्यात दुरूस्ती करणे आवश्यक आहे. करीता, दाव्याचे सरनाम्यात प्रस्तावित वादी कोणत्याही नवीन अनुतोषाची मागणी करीत नाही. त्यामुळे सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर दुरूस्तीने दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताच बदल होत नाही. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>– : आ दे श :–</u>**

१. वादीचा अर्ज (नि.९३) मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्याव्यात व सोबत दुरूस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

Digitally signed by ASHA VISHAL MOHITE
Date: 2026.02.05 17:11:11 +0530

कराड. (श्रीमती ए.व्ही.मोहिते )
दि. ०४/०२/२०२६. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कराड.
ता.कराड, जि.सातारा.